**Annexure – III**

# Maharashtra University of Health Sciences, Nashik

**Trust Deed/Bylaws/Registration Certificate**
**Registration Certificate (Trust/Hospital (Bombay Nursing Act)**

**Faculty :- Physiotherapy.**

**Name of the College/Institute-** Shree Siddheshwar College of Physiotherapy, Solapur.

| | | |
|---|---|---|
| Name of Trust /Society | | Shri Siddheshwar Devasthan, Solapur. |
| Registration Certificate | | **Trust**/ Society<br>**A-249 Date- 5th September 1953**<br>Hospital (Bombay Nursing Act) |
| Name of the College/Institute (As per First Affiliation letter | | Shree Siddheshwar College of Physiotherapy, Solapur. |
| Address | | City Survey no-6095/69 plot no-14,15,16 and City Survey no-6095/4 Near Panch Katta Siddheshwar Peth, Solapur. |
| Email ID | | ssamchsol@gmail.com |
| Telephone /Mobile No(s) | | 0217-2748760<br>9637677600 |
| Website | | www.sscop.edu.in |
| College Code | | 06176 |

Shree Siddheshwar College of Physiotherapy * SOLAPUR

**Dean/Principal Stamp & Signature**

PRINCIPAL
Shree Siddheshwar College
of Physiotherapy, Solapur

(12)

(2)

SUBHASH NAGNATH BET
SOLAPUR
MAHARASHTRA
R. No. 3043
NOTARY

॥ श्री सिद्धेश्वर प्रसन्न ॥

# श्री सिद्धेश्वर देवस्थान, सोलापूर.

—: या संस्थेचे :—

## उद्देश, घटना व नियम

### प्रस्तावना

(१) "श्री सिद्धेश्वर देवस्थान सोलापूर" ही संस्था दी बॉंबे पब्लिक ट्रस्ट अॅक्ट १९५० अन्वये, पब्लिक ट्रस्ट म्हणून जाहीर व रजिस्टर करण्यात आली आहे. तिचा रजिस्टर नंबर पी. टी. आर A २४९ आहे.

(२) देवस्थानची जिंदगी, मालमत्ता व फंडस् यांची नोंद संस्थेच्या निरनिराळ्या रजिस्टरमध्ये ठेवली आहे. देवस्थानच्या मालकीच्या वहिवाटीस असलेल्या सोलापूर व बाहेरील ठिकाणच्या जागा, इमारती व स्थावर जंगम मिळकतीचा उल्लेख मे. फर्स्ट क्लास (सिव्हिल) सब जज्ज सोलापूर यांचे कोर्टात ता. ९-४-१९४० रोजी कायदेशीर रजिस्टर करून घेतलेला आहे. त्यानंतर दि बॉंबे पब्लिक ट्रस्ट अॅक्ट १९५० अन्वये ह्या संस्थेच्या मिळकती रजिस्टर झाल्या आहेत. सालोसाल मिळकतीत झालेल्या वाढीची नोंद संस्थेच्या हिशेबात आहे. त्याचप्रमाणे दैवतावरील नियमित वापरण्याचे व शिलकीचे सोन्या चांदीचे दागदागिने अलंकार वगैरेची नोंद वेगळ्या रजिस्टरमध्ये आहे. संस्थेच्या लाकडी, लोखंडी, पितळी, काचेचे व इलेक्ट्रिकचे सामान-सुमानांच्या यादीची नोंद रजिस्टर बुकात आहे. लोकाकडील धर्मादाय फंडाचे येणे, इतर येणे, बँककडील येणे वगैरे संस्थेच्या चालू हिशेबात दाखविले आहेत. इमारतीचे भाडे भाडेकरीकडून येणे असल्याची नोंद निराळे रजिस्टर बुकात ठेवलेली आहे.

P. [signature]
PRINCIPAL
Shree Siddheshwar College
of Physiotherapy, Solapur.

Shri Siddheshwar D... ...an

# — उद्देश —

(१) सोलापूर यथील श्री सिद्धेश्वराचे मुख्य दैवत व पंचक्रोशातील श्री मल्लिकार्जून, श्री गुरुभेट, श्री रेवणसिद्धेश्वर, श्री यल्लेश्वर श्री सोन्नलगी सिद्धेश्वर, श्री अडकेश्वर, श्री खयेश्वर वगैरे अडुसष्ट लिंगे इत्यादी दैवतांची नित्यनियमित विधींपूर्वक पूजाअर्चा करणे व करविणे.

(२) सोलापूर येथील श्री सिद्धेश्वर देवाची दरवर्षी नंदी-ध्वजाच्या (काठीची) मिरवणूक परंपरेस अनुसरुन करणे व ठरलेल्या वेळी पूर्वापार पद्धतीप्रमाणे ज्या त्या दैवताची यात्रा, उत्सव, पालखी मिरवणूक वगैरे यथासांग करणे.

(३) देवस्थानच्या मालकीचे जागेत बांधकाम करणे, असलेल्या इमारतीची दुरुस्ती करणे, किंवा पडक्या इमारती पाडून नवीन बांधणे, रंग वगैरे करुन इस्टेट सुस्थितीत ठेवणे.

(४) देवस्थानच्या मालकीच्या श्री सिद्धेश्वर तलावाची स्वच्छता दुरुस्ती, गाळ काडणे वगैरे व्यवस्था संस्थेच्या खर्चाने व इतरांची मदत घेऊन करणे अगर करविणे.

(५) देवस्थानास भक्तजनाकडून मिळालेली कोठलीही स्थावर जंगम मिळकत व इतर प्रकारच्या देणग्यांचा स्वीकार करणे व संस्थेच्या उद्देशास पोषक अशा बाबतीत देणगीदाराच्या इच्छेनुरुप त्याचा विनियोग करणे.

(६) देवस्थानकरता प्रचलित कायद्यास पात्र राहून व्यापारी लोकांच्या निरनिराळ्या मालाचे खरेदी विक्रीवर धर्मादाय फंड बसविणे त्यासाठी नियम तयार करणे, दरात फेरफार करणे व फंड वसूल करणे.

(७) देवस्थानच्या निरुपयोगी व नुकसानकारक जागा किंवा इमारतीसंबंधी संबंधित अधिकाऱ्यांच्या मंजुरीने विक्री करणे.

(८) देवस्थानसाठी अत्यंत जरूर असणाऱ्या जागा व इमारती योग्य किमतीस संबंधित अधिकाऱ्यांच्या मंजूरीने खरेदी करणें, त्यावर बांधकाम करणे आणि उत्पन्न वाडविणे.

(९) देवस्थानच्या जागेची व इमारतीची चांगली व्यवस्था ठेवून त्याचे सरकारी अगर म्युनिसिपालिटीचे रीतसर कर देऊन त्या जागा भाड्याने किंवा वापरणेस देऊन संस्थेचे उत्पन्न वाढविणे.

(१०) देवस्थानच्या मालकी वहिवाटीच्या व इतर हक्कासंबंधी

SUBHASH NAGNATH ... NOTARY ... SOLAPUR MAHARASHTRA

Shri Siddheshwar Devsthan * Solapur *

फंड, देणगी, भाडेकरी अगर लायसेन्सीकडील येणे, खंड वसुली वगैरे इतर कोणत्याही कारणासाठी देवस्थानच्या हिताकरिता कोर्टात दावा करणे, कैफियत देणे, दावा काढून घेणे, आपसात तडजोड करणे अगर अपील करणे वगैरे कायदेशीर कामे करणे.

(११) देवस्थानच्या मालकीच्या सोलापूरखेरीज इतर ठिकाणच्या दैवतांची पूजाअर्चा करणे व तेथील मालमत्तेची देखरेख करणे.

(१२) श्री सिद्धेश्वराचे वचनशास्त्र, पुराण वगैरे धार्मिक शास्त्राचे व वाङमयाचे निरनिराळे ग्रंथ जरुर त्या भाषेत प्रसिद्ध करणे, छापणे आणि त्याचा प्रसार करणे, त्याकामी विद्वान लोकांस सहाय्य करणे, पंडीत, शास्त्री मंडळीकडून व्याख्यान, कथा, कीर्तन व पुराणांचे श्रवण घडविणे.

(१३) गरीब जनतेसाठी सदावर्त, दासोह यासारख्या अनेक दुसऱ्या उपयुक्त संस्था चालविणे, त्याचप्रमाणे चांगल्या गाईंचा व देवास सोडलेल्या वळूंचा सांभाळ, मोफत दवाखाने, प्रसूतीगृह, गरीबास आर्थिक मदत अशी व अशा प्रकारची सामाजिक कार्ये करणे.

(१४) वीरशैव समाज बांधवासाठी रुद्रभूमीच्या जागेची निगा ठेवणे.

(१५) सोलापूर अगर इतर ठिकाणी अनेक प्रकारच्या शिक्षण संस्था चालविणे अगर शैक्षणिक कार्यास आर्थिक मदत करणे.

(१६) देवस्थानच्या शेत जमिनी संस्थेमार्फत करणे, खंडाने देणे. खंड वसूल करणे अगर त्याचे उत्पन्न योग्य प्रकारे येत नसल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या मंजूरीने विकणे व आलेली रक्कम उद्देशाप्रमाणे खर्च करणे.

(१७) देवस्थानच्या अगर त्याखाली चालविलेल्या इतर संस्थांच्या हिताकरितां किंवा वाढीकरितां कर्ज काढणे, ती त्या संस्थेकरितां वापरणे आणि त्यासाठी जरुर तेवढे देवालयांच्या इमारती खेरीज संस्थेची इतर इस्टेट तारण ठेवणे व कर्ज फेडणे.

(१८) देवस्थानच्या स्थावर जंगम व इतर अनेक प्रकारच्या मिळकतींचा सांभाळ, देखरेख, हिशेबांच्या वह्यांची व इतर रजिस्टर्स व जरुरी कागदपत्रांची व्यवस्था ठेवणे आणि संस्थेचा कारभार निष्ठेने व प्रामाणिकपणें चालविणे.

PRINCIPAL
Shree Siddheshwar College
of Physiotherapy, Solapur.

SOLAPUR MAHARASHTRA R. No. 2943 NOTARY

Shri Siddheshwar

(१९) संस्थेची जास्त शिलकीची रक्कम सरकारी कर्जरोख्या-मध्ये गुंतविणे व जरूरीचे वेळी ते विक्री करणे.

(२०) संस्थेच्या इतर कामकाजासाठी लागणारी रक्कम योग्य अशा बँकेमध्ये जमा ठेवणें, काढणे अगर व्याजी लावणे.

(२१) संस्थेच्या सांपत्तिक स्थितीचा विचार करून संस्थेच्या वरील उद्देशास बाध न येईल अशी इतर प्रकारची धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक कार्ये चालविणे अगर चालविण्यास घेणे आणि संस्थेची [illegible] भरभराट होईल अशा गोष्टी कायद्यास अनुसरून करणे.

## ~ घटना ~

(१) "श्री सिद्धेश्वर देवस्थान, सोलापूर" हे संस्थेचे नांव कायमचे असावे.

(२) संस्थेचे मुख्य ऑफिस सोलापूर येथे राहील.

(३) देवस्थानचे संकलित जमाखर्चाच्या हिशोबाचे वर्ष कार्तिक शुद्ध १ ते आश्विन वद्य ३० पर्यंतचे असावे.

(४) श्री सिद्धेश्वर देवस्थान या संस्थेचा उपरिनिर्दिष्ट उद्देशाप्रमाणे कारभार व देखरेख कार्य करण्यासाठी एक कमिटी राहील. त्यास "श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटी, सोलापूर" असे नांव राहील.

(५) उपरिनिर्दिष्ट उद्देशाप्रमाणे या पंचकमिटीस देवस्थानचा कारभार करणेचा संपूर्ण अधिकार राहील.

(६) सदर पंच कमिटीस त्यांच्या वतीने संस्थेची व्यवस्था पाहण्यासाठी ज्या त्या विशिष्ट कार्याकरिता ठराविक मुदतीपर्यंत संस्थेचा एक सभासद अगर सभासदांची सबकमिटी नेमण्याचा अधिकार आहे. अशा सभासद अगर सबकमिटीकडून देवस्थानच्या हितास नुकसान पोहोचत आहे असे पंच कमिटीच्या बहुमताने ठरविल्यास तो दिलेला अधिकार त्यांचेकडून केव्हाही काढून घेण्याचा हक्क पंच कमिटीस राहील.

(७) श्री सिद्धेश्वर देवस्थान या संस्थेच्या व्यवस्थापक पंच कमिटीत कमीत कमी २५ व जास्तीत जास्त ३५ पंच असतील.

(८) पंच होऊ इच्छिणाऱ्यांना संस्थेचे नियम, घटना वगैरे मान्य असले पाहिजे त्यांचे वय २१ वर्षापेक्षा जास्त असले पाहिजे

(९) पंच होण्यास अगर राहण्यास खालील लोक अपात्र असतील

(अ) जो वेडा आहे अगर कोर्टामार्फत नादार ठरलेला आहे,

(ब) ज्यांस नैतिक गुन्ह्याबद्दल शिक्षा झालेली आहे,

(क) ज्यांचेकडें देवस्थानच्या फंडाची रक्कम सालअखेर ५० रुपयापेक्षा जास्त राहील व ती बाकी मागणी केली असता एका महिन्यात देणार नाही, असा इसम पंच म्हणून निवडण्यास अपात्र असेल व पंच असेल तर पंच म्हणून राहण्यासही अपात्र समजला जाईल.

(ड) ज्याची देवस्थानच्या हितसंबंधाविरुद्ध व नुकसानकारक वागणूक आहे,

(फ) ज्या पंचाकडून वार्षिक वर्गणी रु. ११ कार्तिक वद्य ३० अखेर लेखी मागणी करुनही येणार नाही त्याचे सभासदत्व आपोआप रद्द होईल.

(इ) पंच कमिटीच्या सतत तीन सभेस योग्य कारणाशिवाय गैरहजर राहील, मात्र अशा तीन सभेमधील काळ चार महिन्यापेक्षा कमी असू नये व अशा रितीने गैरहजर राहिल्यास त्यांचे सभासदत्व आपोआप रद्द होईल.

## — नियम —

### — पंच कमिटीचे अधिकार व कामे —

१) कोणी पंच मयत झाल्यास अगर इतर कारणाने कमी झाल्यास पंचाची जागा रिकामी होईल. पंच कमिटीने पंचाच्या रिकाम्या झालेल्या जागेची निवड करावयाची आहे. नवीन पंच होऊ इच्छिणाऱ्यांचे अर्ज अध्यक्षामार्फत देवस्थान पंचकमिटीपुढे येतील व ज्या अर्जदारास पंच कमिटीच्या एकूण संख्येच्या दोन तृतियांश सभासदांची मते मिळतील त्यांची पंच म्हणून निवड होईल. ही निवड गुप्त मतदान पद्धतीने होईल.

(२) पंच कमिटीने दर तीन वर्षांनी अध्यक्ष, उपाध्यक्ष, चार सेक्रेटरीज् व शिक्षण समितीची निवडणूक करावी.

(३) पंच कमिटीने दर वर्षास महायात्रा कमिटी, दासोह कमिटी, रुद्रभूमी कमिटी, बांधकाम कमिटी व इतर कमिट्यांची व त्या कमिटीच्या चेअरमनची निवड करावी. त्याचे सब्कमिटीत पंच कमिटीने ठरवील तेवढे पंच असावेत.



PRINCIPAL
Shree Siddheshwar College
of Physiotherapy, Solapur.

(४) जर बारा अगर त्याहून जास्त पंचाचे सहीने रिक्विझीश-नच्या रुपाने यादी आल्यास अध्यक्षांनी अगर ते हजर नसल्याम उपाध्यक्षांनी मभा वोलवावी.

(५) सब्-कमिटीच्या कामाची मर्यादा पंच कमिटीने ठरवावी व सब्-कमिटीचा विरुद्ध तक्रार असल्यास पंच कमिटीने त्याचा विचार करावा.

(६) पंच कमिटीच्या कोणत्याही पंचास त्याच्या आजारीपणा-मुळे अगर इतर कांहीं कारणामुळें सभेस हजर राहता येणे शक्य नसल्यास त्यास त्याच्या अर्जावरुन रजेची मुदत सतत सहा महिनेपर्यंत गैरहजर राहण्याची परवानगी देण्याचा अधिकार पंचकमिटीस राहील. पंचकमिटीने परवानगी दिल्यास मुदतीपूर्वी पुन्हा सदरी पंचाचा अर्ज आल्यास सदरी रजेची मुदत ६ महिन्याची वाढविण्याचाही अधिकार पंच कमिटीसच आहे. यापेक्षा जास्त मुदत देता येणार नाही.

(७) देवस्थानकरिता दरसाल सर्टिफाईड ऑडीटर नेमावा व त्यांजकडून हिशेब तपासण्यात यावा.त्याची वार्षिक फी ठरविण्यात यावी.

(८) पंच कमिटीने ठरविल्याप्रमाणे संस्थेची रक्कम सोलापूर येथील बँकेत संस्थेच्या नावाने खाते उघडून ठेवली पाहिजे. ऑफिसात किरकोळ कामाच्या खर्चासाठी रुपये २०० दोनशे पेक्षा जास्त ठेवू नये. बँकेतील रुपये काढण्याचे झाल्यास चेकवर अध्यक्ष व अकौंट सेक्रेटरी या उभयतांच्या सह्या राहतील.

(९) संस्थेच्या नोकराचा पगार कमी जास्त करणे, बोनस देणे ही कामे पचकमिटीने ठरवावी.

(१०) संस्थेच्या नियमात फेरफार करणे झाल्यास व बदलण्याचा पंचकमिटीस अधिकार आहे मात्र अशा फेरफारास पंच कमिटीच्या एकूण संख्येच्या ३/४ सभासदांच्या मंजूरीने बदल घडवून आणता येईल.

—: अध्यक्ष, उपाध्यक्षाचे अधिकार व कामे :—

(१) देवस्थानचे अध्यक्षांनी अगर ते गांवी एका पंधरवड्यापेक्षा जास्त दिवस हजर नसल्यास उपाध्यांनी पंचकमिटीची अगर तहकूब झालेली कमिटीची सभा बोलवावी.

(२) दरसाल -कार्तिक महिन्यांत देवस्थानचे अध्यक्ष यानी पंचकमिटीची सभा बोलावून जमाखर्चाचे अंदाजपत्रक मिटींगपुढे ठेवावे



Shri Siddheshwar Devasthan Solapur

व त्यात झालेल्या फेरफारासहित जे बजेट मंजूर होईल त्याप्रमाणे वागावे. सहा महिन्यानंतर बजेटमध्ये विशेष फेरफार असल्यास पंच-कमिटीपुढे ठेवून मंजूर करुन घ्यावे. बजेटशिवाय इतर कांही जरुर कामाचे खात्यासाठी खर्च करणे झाल्यास पंच कमिटीच्या मंजूरीने खर्च करण्याचा अधिकार अध्यक्ष यांना आहे.

(३) अध्यक्ष याना व त्यांच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष यांना स्वतंत्र रीतीने एका वेळी वर्षास एखाद्या महत्वाचे (देवस्थानचे) कामाकरिता जरुर पडल्यास संस्थेच्या रक्कमेपैकी १०० रुपये पर्यन्त खर्च करण्याचा अधिकार आहे. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या गैरहजेरीत सेक्रेटरीज् यांना एकावेळी २५ रुपयेपर्यन्त खर्च करणेचा अधिकार आहे. परंतु त्याने ती रक्कम पुढील पंच कमिटीत मंजूर करुन घ्यावी.

(४) संस्थेच्या कामास पगारी नोकर ठेवणे अगर काढणे अगर सस्पेंड ठेवणे हे अध्यक्षाचे काम आहे. परंतु या बाबतीत कोणास कांही तक्रार करणे असल्यास एक महिन्यात पंचकमिटीकडे अर्ज करावा.

(५) प्रत्येक जबाबदारीचे काम करणाऱ्या नोकराकडून योग्य ते जामीन घेण्यात यावे.

## —: सेक्रेटरींचे अधिकार व कामे :—

संस्थेचे चार सेक्रेटरीज्कडे चार निरानराळी कामे राहातील.

(१) ऑफीस सेक्रेटरी

(अ) संस्थेच्या नावाने आलेला पत्रव्यवहार पाहून अध्यक्षांच्या सल्ल्याने त्यास उत्तर देणे, पंचकमिटी व इतर सर्व कमिट्यांचे ठरावा-प्रमाणे कामे चालू आहेत किंवा नाहीत हे पहाणे.

(ब) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हे दोघेही एक महिन्यापेक्षा जास्त दिवस गांवी नसल्यास त्यांना पंचकमिटी मिटींग बोलावणे जरुर असल्यास ती ऑफीस सेक्रेटरींनी बोलवावी.

(क) श्री सिद्धेश्वर देवस्थानच्या सर्व स्थावर जंगम इस्टटीचे एक रजिस्टर व श्री सिद्धेश्वर फंड देणाऱ्या इसमाची यादी ऑफीस सेक्रेटरीनी दरसाल तयारी करावी.

(ड) देवस्थानचा वार्षिक रिपोर्ट पंचकमिटीच्या मंजुरीने ऑफीस सेक्रेटरीनी प्रसिद्ध करावे.



PRINCIPAL
Shree Siddheshwar College
of Physiotherapy, Solapur.

SOLAPUR MAHARASHTRA R. No. 3043 NOTARY

Shri Siddheshwar Devasthan Solapur

(२) अकौंटस् सेक्रेटरी –

देवस्थानचे हिशेब दर आठवडयास तपासून सही करणे लोकाकडील येणे वगैरेच्या हिशेबाच्या वह्या व रजिस्टर चालू मित्तीपर्यंत तयार ठेवणे. संस्थेचे बजेट तयार करुन पंच कमिटीपुढे ठेवणे. बजेट प्रमाणे ज्या त्या खर्चास रुपये देणे.

(३) लीगल सेक्रेटरी –

सर्व ट्रस्टीच्या वतीने व त्यांचे करीता संस्थेच्या नावे कोर्टात दावे करणे कैफियती देणे व त्यावर तसेच वकील नावावर सह्या करणे जाब जबाब देणे व जरुर ती व्यवस्था अखेर निकालापर्यंत करण्याचा अधिकार देणेत आला आहे.

(४) इस्टेट सेक्रेटरी –

देवस्थानच्या इस्टेटीची रंगरंगोरी, डागडुजी, पंच कमिटीच्या परवानगीने करविणे, भाडेकऱ्यांचे रजिस्टर महिना अखेर लिहून तयार करवून तपासणे त्याप्रमाणे वसूल पहाणे

–: सब कमिटयांचे अधिकार व कामे :–

(१) ज्या त्या सबकमिटयांनी निदान दोन महिन्यातून एकवेळा तरी सभा बोलवावी.

(२) सब् कमिटयांच्या चेअरमननी आपल्या सहीचे सर्क्युलर काढून सब् कमिटी मीटींग बोलवावी व त्यात विषय, वेळ व स्थळ नमूद करुन सब् कमिटीच्या मीटिंग पूर्वी दोन दिवस अगोदर सभासदाकडे सहीसाठी पाठवावे.

(३) कोणताही सब् कमिटीचा मेंबर सतत तीन कमिटयास योग्य कारणाशिवाय गैरहजर राहील तेंव्हा त्याबद्दल त्या कमिटीच्या चेअरमननी पंचकमिटीस रिपोर्ट करावा. पंचकमिटीने त्यांचे नांव त्या कमिटीतून कमी करावे व त्याचा निकाल सब् कमिटीस कळवावा.

(४) सब् कमिटीची कोरम झाल्यावर त्या सभेस चेअरमन हजर नसल्यास अर्ध्या तासानंतर सभासदांनी आपणापैकी एका पंचास चेअरमन नेमून सभेचे काम चालवावे.

SUBHASH JAGANATH ... SOLAPUR MAHARASHTRA R. No. 3048 * NOTARY *

Shri Siddheshwar Devasthan * Solapur. *

## —: सभेची कार्य पद्धती :—

(१) पंच कमिटी अगर कोणत्याही सब् कमिटयांचे कोरम एकूण संख्येच्या ⅓ हजर सभासदांचे पाहिजे. पंच कमिटीचे अगर सब् कमिटयाचे ठराव पास झाल्यातारखेपासून अंमलात येतील.

(२) पंच कमिटीत अगर सब् कमिटयात मते समसमान पडल्यास त्या कमिटीचे अध्यक्ष अगर चेअरमन यांना जादा मत (कास्टिंग व्होट) देण्याचा अधिकार आहे.

(३) पंच कमेटीचे कोरम झाल्यावर त्या सभेस अध्यक्ष हजर नसल्यास अर्ध्या तासानंतर उपाध्यक्षांनी अध्यक्ष म्हणून त्या सभेचे काम चालवावे. जेव्हा अध्यक्ष व उपाध्यक्ष दोघेही हजर नसल्यास पंचानी आपणापैकी एका पंचास अध्यक्ष नेमून सभेचे काम चालवावे.

(४) पंच कमिटीची सभा निदान दर दोन महिन्यातून एकवेळ तरी बोलवावी. सभेचे प्रोसिडिंग वेळचेवेळी प्रोसिडिंग बुकात लिहून पुढील पंचकमिटी मीटिंगमध्ये प्रथम वाचून कायम करुन घेण्यात यावे.

(५) पंच कमिटीची सभा बोलावताना कमिटीपुढे येणाऱ्या विषयांची यादी व कमिटी भरविण्याची तारीख व वेळ आणि मीटिंग भरण्याची जागा सर्क्युलरमध्ये नमूद करून सभा बोलवावी. पंच कमिटीच्या सभेची नोटीस सभेच्या अगोदर तीन दिवस काढली पाहिजे. अजेंड्यावरील विषयाखेरीज इतर आयत्यावेळचे विषय अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे मांडता येतील. परंतु तहकुब झालेल्या पंच कमिटीच्या सभेपुढे आयत्यावेळचे विषय विचारासाठी घेता येणार नाहीत.अध्यक्ष यास अत्यंत जरुर अशा विषयासंबंधी स्पेशल पंच कमिटी मिटिंग एक दिवस अगाऊ नोटीसीने बोलावता येईल.

(६) पंच कमिटीची अगर सब् कमिटीची सभा बोलाविल्यावर सभेच्या दिवशी कोरमसाठी अर्धा तास वाट पाहून कोरम न झाल्यास सभा तहकूब करावी.

(७) कोरमच्या अभावी तहकूब होऊन पुन्हा बोलाविलेल्या पंचकमेटीच्या सभेस कोरमची जरुरी नाही.

(८) पोल मागविण्याची वेळ आल्यास पांच सभासदांनी पोल मागावे व त्याप्रमाणे सेक्रेटरी अगर संस्थेचे कारकून यांनी अनुकूल व प्रतिकूल सदरात ज्यांची त्यांची नावे लिहावीत व त्याबद्दल रेकॉर्ड ठेवावे.



**PRINCIPAL**
**Shree Siddheshwar College of Physiotherapy, Solapur.**

Shri Siddheshwar Devsthan ... Solapur *

SOLAPUR MAHARASHTRA R. No. 3043 NOTARY

(९) सभेचे काम चालू असताना अध्यक्षाखेरीज कोणाम
बोलण्याचे झाल्यास सभेच्या वेळी अध्यक्षाचे परवानगीनें एका पंचाने
उभे राहून व ने ही विषयास अनुसरुन बोलावे. व्यक्ति विषयक टीका
अगर सभेच्या कामात व्यत्यय आणण्याचे वर्तन करु नये. अध्यक्षाने
दिलेल्या हुकमाविरुद्ध वर्तन करु नये. या विरुद्ध वर्तन घडल्यास त्याम
सभेत भाग न घेण्याबद्दल कमिटीच्या बहुमताने बाहेर जाण्याविषयी
मागण्याचा अथवा सभा तहकूब करण्याचा अधिकार अध्यक्षानां आहे.
अशी पंचास बाहेर जाण्याचा हुकूम केल्यावर त्या पंचाने बाहेर जावे
जर अध्यक्षाचा हा हुकूम अमान्य करण्यात आल्यास सदरी पंचास
सभेत कोणत्याही प्रकारचा भाग घेता येणार नाही. या सभासदाच्या
वरील वर्तणुकीबद्दल पंच कमिटीस, कमिटीतून कमी व करण्याचा जरुर
तो उपाय करण्याचा पूर्ण अधिकार राहील. सभेचे काम चालू असताना
पंचास अध्यक्षाचे परवानगी शिवाय सभेतून जाता येणार नाही.

(१० कोणताही ठराव पंचकमिटीने पास केल्यावर तो
त्यानंतर तीन महिनेपर्यंत बदलता येणार नाही तीन महिन्यापूर्वी तो
ठराव बदलून घेणे, इष्ट वाटल्यास त्यासाठी पंचकमिटीतील सभासदा-
पैकी ७ पंचाच्या सहयाने, ठराव पास झाल्यापासून एक महिन्याच्या
आत यादी आल्यास पंच कमिटीस जरुर तो फेरफार करण्याचा
अधिकार राहील सब् कमिटीच्या ठरावाच्या बाबतीत ठराव बदलून
घेणे असल्यास पंच कमिटीकडे यादी देण्यात यावी.

(११) कोणाही पंचास पंचकमिटी मीटिंगमध्ये अगर सब्-
कमिटयांच्या मीटिंग मध्ये सभा तहकूबीशिवाय इतर विषयावर चर्चा
सुरु होण्यापूर्वी एकादी सूचना आणावयाची असेल तर ती सूचना
आणता येईल. त्या सूचनेस दुसऱ्या सभासदाकडून अनुमोदन मिळाल्या-
वर ती सूचना मे. अध्यक्ष यानी मीटिंग पुढे ठेवावी. सदर सूचनेवर
कोणा पंचास उपसूचना आल्यास व त्यासही वरीलप्रमाणे अनुमोदन
मिळाल्यास सूचना व उपसूचना मतास टाकावी त्यात ज्या सूचने-
वर जास्त मते पडतील ती सूचना मंजूर झाली असे जाहीर करावे
परंतु अध्यक्षांच्या सूचनेस अनुमोदनाची जरुरी नाही.

(१२) एकापेक्षा अधिक उपसूचना मीटिंगमध्ये मांडल्या गेल्यास
त्यापैकी शेवटची व त्यावरील लगतची उपसूचना याप्रमाणे मतास
घालून पास झालेली उपसूचना शेवटपर्यंत वरील यादी व त्यानंतर



SUBHASH NAGNATH
SOLAPUR
MAHARASHTRA
R. No.
NOTARY
Shri Siddheshwar
Solapur

ठरावाबरोबर पास झालेली ती उपसूचना मतास घालून त्यात जी उपसूचना पास होईल ती पुन्हा मुख्य सूचना म्हणून सभेपुढे ठेवून त्यावर झालेला ठराव पास झाला असे जाहीर करावे. ठरावावर मते देणारांची अनुकूल प्रतिकूल नावे मागणी केल्यास नोंद करावीत.

## - इतर नियम -

(१) ज्यासंबंधी खास उल्लेख नसतील अशा ठरावाखेरीज पंच कमिटीचे ठराव व सब-कमिटयांचे ठराव सर्व बहुमताने पास होतील.

(२) श्री सिद्धेश्वर देवस्थानास इमारत देणगीदाखल वगैरे बांधून देणे झाल्यास त्याने आगाऊ अध्यक्षाकडे अर्ज करावा. अध्यक्षाने पंच कमिटीच्या संमतीने पुढील तजवीज करावी.

(३) (अ) श्री सिद्धेश्वर देवस्थानास कोणास कांही स्थावर अगर जंगम इस्टेट देणगी रूपाने द्यावयाची असल्यास त्यानी देवस्थान तर्फे संस्थेचे अध्यक्ष अगर सेक्रेटरी यांचे नांवे कायदेशीर कागदपत्र करून त्यांच्या स्वाधीन करावे.

(ब) संस्थेतर्फे स्थावर अगर जंगम इस्टेटीचे भाडेपट्टे, करारनामे वगैरे किरकोळ कागदपत्र करणे झाल्यास पंच कमिटीच्या ठरावाने त्या त्या वेळचे सेक्रेटरी व अध्यक्ष यांना तसे करून घेण्याचा अधिकार आहे

(४) (अ) श्रीच्या देवस्थानास कोणी स्थावर जंगम इस्टेट देणगीच्या रूपाने अगर मृत्युपत्र करून दिल्यास त्याची सर्व व्यवस्था पंचकमिटीने देणाऱ्याच्या इच्छेप्रमाणे करावी

(ब) परंतु तशी व्यवस्था होणे शक्य नसल्यास मात्र संस्थेच्या निराळ्या उपयुक्त कामाकडे पंच कमिटीने त्याची व्यवस्था करावी.

(क) परंतु देणगी देणारा ( पुरुष अगर स्त्री ) हयात नसल्यास आणि त्याच्या इच्छेप्रमाणे व्यवस्था होणे शक्य नसल्यास पंच कमिटीने त्यांच्या हेतूस अनुसरून देवस्थानच्या तशाच उपयुक्त दुसऱ्या कामाकडे योग्य रीतीने त्याची व्यवस्था करावी

(५) देवस्थानास एखादी स्थावर जंगम इस्टेट देणगी रूपाने मिळाली असून तिचे उत्पन्न खर्चाच्या मानाने कमी येत असेल अगर मुळीच येत नसेल असे वाटल्यास व ती स्थिती तीन वर्षे कायम



PRINCIPAL
Shree Siddheshwar College
of Physiotherapy, Solapur.

SOLAPUR MAHARASHTRA Reg. No. 3043 NOTARY

Shri Siddheshwar Devasthan ...pur. *

राहिल्यास ती सव इस्टेट कायदेशीर सल्याने संबंधित अधिकाऱ्यांच्या मंजूरीने विक्री करण्याचा अधिकार पंच कमिटीस आहे.

(६) (अ) कोणत्याही पंचास देवस्थानचा हिशेब पाहण्याचा अधिकार आहे. मात्र हिशेबाच्या नकला घेणें अगर कागदपत्र पहाणे झाल्यास अध्यक्षांची परवानगी घ्यावी.

(ब) अगर ठरावाच्या नकला पाहिजे असल्यास लेखी अर्ज अध्यक्षाकडे करावा. नकला देणे अगर न देणे अध्यक्षांच्या मर्जीवर अवलंबून राहील. व त्याबद्दल कारण विचारता येणार नाही.

(७) मात्र संस्थेच्या कामात अध्यक्षांच्या परवानगीशिवाय विनाकारण हस्तक्षेप घालण्याचा, व्यत्यय आणण्याचा पंचास अधिकार नाही व त्याचप्रमाणे देवस्थानचे कागदपत्र कोणत्याही सबबीवर अध्यक्षांच्या लेखी परवानगीशिवाय ऑफिसच्या बाहेर नेण्याचा अधिकार नाही.

(८) देवस्थानचे कामासंबंधी कोणाची तक्रार असल्यास त्यानी ती अध्यक्ष अगर सेक्रेटरी याना लेखी कळवावी. म्हणजे त्याची व्यवस्था रीतीप्रमाण करण्यात येईल.

(९) सदरहू देवस्थानला दरसाल पंधरा रुपयापेक्षा जास्त ( श्री सिद्धेश्वर धर्मादाय फंड ) फंड देणाऱ्या सर्व व्यापाऱ्याना अगर देणगीदाराना प्रसिद्ध होणाऱ्या त्या सालच्या रिपोर्टची एक प्रत देण्यात यावी.

(१०) देवस्थानचे कामासंबंधी अगर संस्थेसंबंधी काही सुचना कोणाही भक्तास करणे झाल्यास त्याकरिता ऑफिसांत ठेवलेल्या सूचना वहीमध्ये शेरा लिहावा व त्या लिहीलेल्या शेऱ्याचा विचार पंच-कमिटीने करावा.

SUBHASH NAGNATH ... NOTARY SOLAPUR MAHARASHTRA R. No. 3043

श्री सिद्धेश्वर देवस्थान सोलापूर.

Shri Siddheshwar Devsthan Solapur.

## श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी सभासदांची यादी

| अ.नं | नाव | पत्ता | फोन नंबर |
|---|---|---|---|
| १) | श्री. धर्मराज अण्णाराज काडादी | १४७, रेल्वे लाईन्स, सोलापूर - १ | २३१३७८८, ९४२२०६८२८८ |
| २) | ॲड श्री. रेवणसिध्दप्पा सिद्रामप्पा पाटील | ५२०, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर | २३२४५०७, ९८८१४६७६८९ |
| ३) | प्रा. श्री. गंगाधर निलकंठ कुमठेकर | ३९, गुमास्ता हौसिंग सोसायटी, सोलापूर | २६०११५९, ९८९०२५६५६७ |
| ४) | श्री. सुभाष बंडप्पा मुनाळे | ४/२१, भवानी पेठ, सोलापूर | २३७००००, ७९७२८०७६०० |
| ५) | श्री. सिद्रामप्पा नागप्पा बमणी | ३, सर्वोदय नगर, सोलापूर | २६०१४८५, ९८९०२३३४९९ |
| ६) | श्री. केदार अदलिंगप्पा हब्बु | ७८९, उत्तर कसबा, सोलापूर | २६२८०९२ |
| ७) | श्री. सोमशंकर मल्लिकार्जुनप्पा देशमुख | ३१९, दक्षिण कसबा, सोलापूर | ८८८८२८४३९८ |
| ८) | श्री. बाळासाहेब विश्वनाथ भोगडे | ९१७, उत्तर कसबा, सोलापूर | २७३१२९१, ९६८९०४७६७६ |
| ९) | ॲड. श्री. मिलिंद शिवशंकर थोबडे | १८४, गोल्डफिंच पेठ, सोलापूर | २६२५३१७, ९४२२०६९३३३ |
| १०) | ॲड श्री. विश्वनाथ शिवलिंगप्पा आळंगे | ८७-अ/३५, भवानी पेठ, सोलापूर | २६२००४१, ९४२२०६७०२५ |
| ११) | श्री. रामकृष्ण विश्वनाथ नष्टे | २८७/९, जोडभावी पेठ, सोलापूर | २३२५३५५, २३७५४५५ |
| १२) | श्री. महादेव बाबुराव चाकोते | १९८/९९, जोडभावी पेठ, सोलापूर | ९४२२०६५८८८ |
| १३) | श्री. काशिनाथ शंकरेप्पा दर्गोपाटील | १५२, गुरूवार पेठ, सोलापूर | २७२४२३९, ९९२१४३५०६६ |
| १४) | श्री. मल्लिकार्जुन गंगाधर कळके | श्री सिध्देश्वर साखर कारखाना क्वार्टर्स, सोलापूर | २६०१५४१, ९९७०७५४३८३ |
| १५) | श्री. चिदानंद रेवणसिध्दप्पा वनारोटे | ४८६, शुक्रवार पेठ, सोलापूर | २३२०३१६, ९३२५६७२७११ |
| १६) | श्री. गिरीष नानासाहेब गोरनळ्ळी | ३००, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर | ३२४४५५५, ९३७३३५३५११ |
| १७) | श्री. सुनिल बाळासाहेब चव्हाण | कैलास ४/२, रेल्वे लाईन्स, सोलापूर | २७२६८०३, ९७६६५४२०९८ |
| १८) | श्री. निलकंठप्पा मडिवाळप्पा कोनापूरे | १५७, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर | ९०९६४९९१२९ |
| १९) | श्री. भिमाशंकर शिवशंकर पटणे | १९५/२२, बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर | ९८९००९४४५५ |
| २०) | श्री. विश्वनाथ नागप्पा लब्बा | ४२८, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर | २७२४९४४, ९४२०६६३०५० |
| २१) | श्री. शिवकुमार शिवलिंगप्पा पाटील | ४५/११, प्रभाकर हौ. सोसायटी, बुधवार पेठ, सोलापूर | ९४२३३६८००० |
| २२) | श्री. गुरूराज रूद्रेश माळगे | ३०३, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर - २ | ९९६००१०२८८ |
| २३) | डॉ. श्री. राजेंद्र सोमशंकर घुली | ६०४ अ, मंगल रेसिडन्सी, डी-मार्ट जवळ, जुळे सोलापूर | ९५५२५५५०२१ |
| २४) | प्रा. श्री. राजशेखर रामलिंग येळीकर | ७७, विशाल नगर, भारती विद्यापीठ जवळ, जुळे सोलापूर | ९४२३५८८९७५ |
| २५) | श्री. सुरेश सिद्राम म्हेत्रे (कुंभार) | ७, गुरप्पा म्हेत्रे वस्ती, कुमठा नाका, सोलापूर | ९४२२६४४०३८ |
| २६) | श्री. काशिनाथ रेवप्पा ढोले | १७/७९, सुजाता बंगला, सिव्हील लाईन, गांधी नगर, सोलापूर | ९१५८५५५९९९ |
| २७) | श्री. मल्लिनाथ रामप्पा मसरे | ८९४/९५, उत्तर कसबा, मसरे गल्ली, सोलापूर | ९४२३३३२३०० |
| २८) | श्री. प्रकाश संगप्पा बिराजदार | फा.प्लॉट नं. ९२ए/२/३/४, शेळगी रोड, शेळगी, सोलापूर | ९४२२६४६६११ |
| २९) | श्री. विलास गुंडप्पा कारभारी | ५६०/५९, चौहान अपार्टमेंट, दक्षिण सदर बझार, सोलापूर | ७२१९०६८८८१ |
| ३०) | श्री. रतन विश्वनाथ रिक्के | ३०१ बी बिल्डींग, हरिपद्म रेसिडेन्सी, बुधवार पेठ, सोलापूर | ९४२२४५८९७७ |
| ३१) | श्री. प्रभुराज बसवराज मैंदर्गीकर | ब्लॉक नं. ८, वृंदावन सोसायटी, सम्राट चौक, सोलापूर | ९८९०९०७७५५ |
| ३२) | श्री. चन्नबसव बापूराव नाडगौडा | १५६, सेक्टर ५, उमा नगरी, जुनि मिल, मुरारजी पेठ, सोलापूर | ९५५२५२९२२७ |
| ३३) | श्री. नितीन मल्लिकार्जुन उपासे | १०२/बी/७/८, श्रीशैल बंगला, घोंगडे नगर, भवानी पेठ, सोलापूर | ९४२२०६७४७६ |
| ३४) | श्री. पशुपतीनाथ विजयकुमार माशाळ | १९/२, भवानी पेठ, जम्मा चाळ जवळ, सोलापूर | ७०५७७७१६५९ |